**नि.फौ.के. नं. ११६/२०२५**
**महाराष्ट्र शासन वि. विजय**
**निशाण क्र. २४**

**(प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सदर आरोपी हा इतर गुन्हयांत कोल्हापुर मध्यवर्ती कारागृह येथे असल्याने त्यांचेकडुन व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे सदर आरोपीस हजर करण्यात आले. सदर व्हीडीओ कॉलची आवाज प्रेक्षपणाचा दर्जा तपासुन पाहण्यात आला असुन तो चांगला आहे. सदर आरोपी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर असताना त्याचेसमक्ष साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात येत आहे.**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०९ यांचा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – सचिन नामदेव कामेरकर,
**वय –** ४१ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी, (पो.हे.कॉ./१४३०),
**राहणार –** देवरुख पोलीस ठाणे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०१**. दिनांक ३०/१०/२०२५ रोजी मी देवरुख पोलीस येथे कार्यरत होतो. त्यादिवशी संजयकुमार गंगाराम महाडीक, कळंबेळे, फौजदारवाडी येथील त्यांच्या घराची कौले काढुन घरात शिरुन कपाट अस्ताव्यस्त करुन घरफोडी चोरी करण्याचा प्रयत्न केलेबाबत तक्रार दिली होती. त्यानुसार, दाखल गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक यांच्या आदेशानुसार माझ्याकडे देण्यात आला. *(साक्षीदारास तपासाचा लेखी आदेश दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी व पोलीस निरीक्षक श्री. झावरे यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला **निशाणी क्र.२५** देण्यात येते).*

**०२.** दिनांक ३०/१०/२०२५ रोजी मी पंच – मकरंद पांचाळ व मनिष महाडीक यांच्यासमक्ष घटनास्थळी घटनास्थळ पंचनामा केला. *(साक्षीदारास निशाणी क्र. ११ कडील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी, फिर्यादी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे*. त्यावेळी, आम्ही पोलीस, पंच, फिर्यादी, फॉरेन्सीक पथक, श्वान पथक व अंगुली मुद्रा तज्ञ पथक असे सर्वजन हजर होतो.

**०३.** सदर घराच्या बाजुला असलेली शिडी वापरुन घरातील कौले काढुन कपाटाच्या सहयाय्याने घरामध्ये उतरुन कपाटे अस्ताव्यस्त केल्याचे, स्वयंपाक घरात जेवण बनविल्याचे दिसुन आले. तसेच, घराच्या अंगणामधील पत्रा शेडमध्ये एका लाकडी पलंगावर मिठाची भरणी व जेवणाची भांडी ठेवल्याचे दिसत होते. तेथे एक आधारकार्ड गणेश शिवाजी माने, जन्म तारिख १३/०३/१९९७ असे लिहिलेले, सिमकार्ड – एक जिओ कंपनीचे त्याचा क्रमांक ९३७०६९३५०४ व कठडयावर जीन्स पँट ठेवलेली – एक निळया रंगाची GLACIER होती. ते आधारकार्ड, सिमकार्ड व जीन्स पँट मी जप्त केले. *(साक्षीदारास वस्तु अ, ब, व क कडील मुद्देमाल दाखविण्यात आला). ते तेच आधारकार्ड, सिमकार्ड व जीन्स पँट असुन त्यांच्या लेबलवर माझी व पंचांची सही आहे.*

**०४.** सदर घटनास्थळी पंचनामा करतेवेळी पो.शि.श्री. साळुंखे, श्री. लगारे, महिला पो.शि. कुरणे, महिला पोलीस प्रमुख शिपाई श्रीमती वेलवणकर असे सर्वजन हजर होते. श्रीमती कुरणे यांनी ई–साक्ष, व्हीडीओ व छायाचित्रे घेण्यासाठी मी त्यांना सांगितले होते. सदर ठिकाणी दिसत्या वस्तुस्थितीप्रमाणे, २१:४१ ते २३:०८ या

दरम्यान पंचनामा पुर्ण करुन घटनास्थळाचा नकाशा मी रेखाटला होता. *(साक्षीदारास निशाणी क्र. १३ कडील घटनास्थळ नकाशा दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे.*

**०५**. त्यानुसार, घेण्यात आलेली छायाचित्रे मी प्रकरणात समाविष्ठ केली आहेत. *(साक्षीदारास प्रकरणातील छायाचित्रे दाखविण्यात आली). अनुक्रमांक ०१ कडील छायाचित्रांत पंच साक्षीदार स्वाक्षरी करीताना दिसुन येत आहेत. अनुक्रमांक ०२ कडील छायाचित्र हे फिर्यादीच्या अंगणातील असुन त्यामध्ये जेवणाची भांडी दिसुन येत आहेत. अनुक्रमांक ०३ व ०४ कडील छायाचित्रांत फिर्यादी व पंच स्वाक्षरी करीताना दिसुन येत आहेत. अनुक्रमांक ०५ कडील छायाचित्र हे घरातील कपाट अस्ताव्यस्त केलेबाबतचे आहे. अनुक्रमांक ०६ कडील छायाचित्र हे फिर्यादीच्या छताची कौले काढुन आल्याचे दिसुन येत आहे. सर्व छायाचित्रांवर माझी स्वाक्षरी आहे.*

*(सदर छायाचित्रांना निशाणी क्रमांक देण्यास बचाव पक्षाने आक्षेप घेतला की, सदरची छायाचित्रे घटनास्थळाची नसुन पंचनाम्यामध्ये घटनास्थळाचे अक्षांश व रेखांश नमुद नाहीत. सहा.सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तुतच्या साक्षीदाराने छायाचित्रे घटनास्थळाची असलेबाबत कथन केले असलेबाबतचा युक्तीवाद सादर केला.*

*अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ०७ च्या साक्षीतील भारतीय साक्ष अधिनियमाचे कलम ६३-४-सी अन्वयेचे प्रमाणपत्र सिध्द झाले असुन त्यास निशाणी क्रमांक देण्यात आले आहे. प्रस्तुत साक्षीदाराने सदरची छायाचित्रे घटनास्थळाची असुन त्यावर त्यांची स्वाक्षरी असल्याचे कथन केले आहे. सबब, आक्षेप नामंजुर.)*

**०६**. *(सर्व **छायाचित्रांना एकत्रीतपणे निशाणी क्रमांक २६** देण्यात येते).*

०७. *जप्त मुद्देमालाची पावती तयार करुन तो मुद्देमाल मुद्देमाल कारकुनाच्या ताब्यात देण्यात आला. (साक्षीदारास मद्देमाल पावती दाखविण्यात आली). ती तीच असुन त्यावर मुद्देमाल कारकुन व माझी सही आहे. (सदर दस्तास **निशाणी क्रमांक २७** देण्यात येते).*

०८. महिला पोलीस शिपाई श्रीमती कुरणे यांनी ई–साक्षमध्ये छायाचित्रे छोटे–छोटे व्हीडीओ भार केलेबाबतचे प्रमाणपत्र व भारतीय साक्ष अधिनियमाचे कलम ६३–४–सी अन्वयेचे प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले आहे. फॉरेन्सीक विभागाने दिलेले प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल करण्यात आले आहे.

०९. सदर जप्त केलेल्या सिमकार्डचे सीडीआर वरुन सदर क्रमांकावरुन अनिल बाबुराव पवार, राहणार – दापोली यांना फोन केल्याचे दिसुन आले. त्यावरुन, अनिल पवार यांच्याकडे चौकशी केली असता, ते बाळुमामा, आदमापुर, जि. कोल्हापुर येथे गणेश माने यांच्यासोबत दर्शनासाठी हजर असताना अनिल पवार याचा मोबाईल घरातच विसरल्याने त्यांनी गणेश माने यांच्या मोबाईलवरुन फोन केल्याचे सांगितले. अनिल पवार याने पुढे असे सांगितले की, दापोली येथे परत आल्यानंतर दिनांक २५/१०/२०२५ रोजी व दिनांक २६/१०/२०२५ गणेश माने याला फोन केला असता, त्याने फोन उचलले नाहीत व काही वेळा फोन बंद लागत होता. दिनांक २८/१०/२०२५ रोजी त्यांनी पुन्हा फोन केला असता, गणेश माने याने सांगितले की, त्याच्याकडुन फोन लावण्यासाठी एकाने फोन मागुन घेवुन तो चोरी करुन तेथुन निघुन गेला त्यामुळे त्याने फोन उचलला नाही. त्यानंतर त्याच क्रमांकाचे नवीन सिमकार्ड घेतल्यानंतर त्याने सदरचा फोन उचलला. त्यानुसार, मी अनिल पवार यांचे तपासटिपण

नोंदविले.

१०. त्यानुसार, मी गणेश शिवाजी माने, राहणार – लिंब, ता. जि. सातारा याचे तपासटिपण नोंदविले. त्याच्या सांगण्यानुसार, दिनांक १८/१०/२०२५ रोजी संत बाळुमामा, आदमापुर, जि. कोल्हापुर येथे तो सेवा करण्यासाठी गेला असताना विशाल पुजारी, रत्नागिरी पोलीस असे नाव सांगुन एकाने त्याच्याकडे मोबाईल फोन करण्यासाठी मागितला होता. त्यानंतर तो मोबाईल त्याने परत केला. त्यानंतर महाप्रसाद वाटप सुरु असताना त्याने मावशीला व्हीडीओ कॉल करायचा आहे, असे सांगून पुन्हा त्याच्याकडुन मोबाईल घेतला. तो महाप्रसाद वाटत असताना विशाल पुजारी असे नाव सांगितलेला तो व्यक्ती मोबाईल बोलत–बोलत निघुन गेला व नंतर तो परत आला नाही. नंतर त्याने त्याची वाट पाहिली व तो घरी निघुन आला. वडीलांच्या फोनवरुन त्याने फोन केल्यानंतर तो व्यक्ती व्यवस्थीत बोलत नव्हता. त्यानंतर त्याने त्याच क्रमांकाचे नवीन सिमकार्ड खरेदी केले. सदर मोबाईलमध्ये त्याचे आधारकार्ड पाठीमागील बाजुस होते. शाहुवाडी, जि. कोल्हापुर पोलीस ठाण्याकडुन घरफोडी करणारा चोर विजय मधुकर गुरव, याचे छायाचित्र प्राप्त झाल्यानंतर ते गणेश माने याला दाखविले असता, त्याने त्याच व्यक्तीने त्याचा मोबाईल घेवुन गेल्याचे सांगितले. तसे गणेश माने याचे तपासटिपण नोंदविण्यात आले.

११. त्यानुसार, आरोपीला घेवुन कोसुंब, समर्थ मठ येथे येवुन पुजारी रमेश किंजळे यांना दाखवुन विचारले असता त्यांनी देखील तो इसम त्यांच्या मठात आला होता, असे सांगितले. त्यानंतर, शाहुवाडी पोलीस ठाणे, जि. कोल्हापुर येथे आरोपी दुसऱ्या गुन्हयात असल्याने न्यायालयास प्रस्तुत प्रकरणात वर्ग करण्यासाठी अहवाल

सादर करण्यात आला. सदर आरोपीविरुध्द १२ गुन्हे दाखल होते. *(साक्षीदारास सदरचा अहवाल दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी व पोलीस निरीक्षक यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला **<u>निशाणी क्रमांक २८</u>** देण्यात येते).*

**१२**. त्यानुसार, शाहुवाडी पोलीस ठाणे, जि. कोल्हापुर गुन्हा नोंदणी क्र. ३३३/२०२५ मधील आरोपी वर्ग करुन मिळण्यासाठी पत्र व्यवहार करण्यात आला. त्यानंतर आरोपीस मध्यवर्ती कारागृह कळंबा, जि. कोल्हापुर येथुन दिनांक २२/१२/२०२५ रोजी आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्यासाठी मध्यवर्ती कारागृह कळंबा, जि. कोल्हापुर यांना आरोपीचा ताबा मिळण्यासाठी पत्र व्यवहार करण्यात आला होता. *(साक्षीदारास सदरचे पत्र दाखविण्यात आले). ते तेच असुन त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला **<u>निशाणी क्रमांक २९</u>** देण्यात येते)*

**१३**. त्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय, देवरुख यांना पत्र देण्यात आले. *(साक्षीदारास सदरचे पत्र दाखविण्यात आले). ते तेच असुन त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला **<u>निशाणी क्रमांक ३०</u>** देण्यात येते).*

**१४**. त्यानंतर आरोपीला अटक करण्यात येवुन आरोपीचा अटक फॉम भरण्यात आला. *(साक्षीदारास अटक पंचनामा दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी, दोन पंचांची व आरोपीची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला **<u>निशाणी क्रमांक ३१</u>** देण्यात येते).*

**१५**. *(साक्षीदारास अटकेची चेकलिस्ट दाखविण्यात आली). ती तीच असुन*

*त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला* ***निशाणी क्रमांक ३२*** *देण्यात येते).*

**१६.** *(साक्षीदारास भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे, २०२३ चे कलम ४८ नुसारचा अहवाल दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी व आरोपीची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला* ***निशाणी क्रमांक ३३*** *देण्यात येते).*

**१७.** *(साक्षीदारास भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे, २०२३ चे कलम ४७(१) नुसारचा अहवाल दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी व आरोपीची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला* ***निशाणी क्रमांक ३४*** *देण्यात येते).*

**१८.** न्यायालयासमोर हजर केल्यानंतर आरोपीस ०१ दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली होती. त्या दरम्यान आरोपीला घटनास्थळी नेण्यात आले. त्यावेळी तेथे फिर्यादी व साक्षीदार हजर होते. तेथे आरोपीने घराची कौले काढ्रुन घरामध्ये शिरुन कपाट अस्ताव्यस्त केल्याचे, स्वयंपाक घरात जावुन जेवण बनवुन जेवण केल्याचे व पुन्हा जेवण करुन ते डब्यात भरुन घेतल्याचे कबुल केले. तसेच सदर घरातील ट्रॅक पॅंट घालुन तेथुन निघुन गेल्याचे त्याने सांगितले होते.

**१९.** त्यानंतर, दिनांक २४/१२/२०२५ रोजी आरोपीला कळंबा, जि. कोल्हापुर येथे जमा करावायाचे असल्याने त्याची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय, देवरुख यांना पत्र देण्यात आले. *(साक्षीदारास सदरचे पत्र दाखविण्यात आले). ते तेच असुन त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर*

*दस्ताला **निशाणी क्रमांक ३५** देण्यात येते).* त्यानंतर आरोपीला मध्यवर्ती कारागृह कळंबा, जि. कोल्हापुर येथे जमा केले.

२०. त्यानंतर, मी फिर्यादी व इतर साक्षीदारांची टिपणे नोंदविली. तपासकामी केलेल्या स्टेशन डायरीचे उतारे हस्तगत करुन ती अभिलेखावर दाखल केली आहेत. *(साक्षीदारास ठाणे दैनंदिनी क्रमांक ०१८/२०२५ चा उतारा दाखविण्यात आला). दिनांक ३०/१०/२०२५ रोजी घटनास्थळी रवाना झाल्याचे सदरची नोंद आहे. त्यावर महिला पोलीस कर्मचारी श्रीमती कांगणे यांची सही आहे.*

> *(सदर दस्तास निशाणी क्रमांक देण्यास बचावपक्षातर्फे आक्षेप घेण्यात आला की, सदर दस्तावर साक्षीदाराची सही नाही. यावर, अभियोगपक्षातर्फे युक्तीवाद करण्यात आला की, सदरचा मजकुर प्रस्तुत साक्षीदारानेच नोंद केला असुन त्याच्या प्रती मागितल्यावर तत्कालीन ठाणे अंमलदार यांच्या स्वाक्षरीने त्या दिल्या जातात. त्यामुळे, सदरच्या दस्तास निशाणी क्रमांक देता येणार नाही.*
>
> *दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहिले).*

**न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्यामुळे सदर प्रकरण आक्षेपावरील आदेश व उर्वरीत उलटतपासाकरीता पुढील तारखेपर्यंत तहकुब करयात येते.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.04.27 18:16:30 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**
न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,
जि. रत्नागिरी.

दिनांक २७/०४/२०२६
स्थळः देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 27/04/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 27/04/2026 |
| Evidence uploaded on | :- | 27/04/2026 |